प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई 400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S. Marg, Mumbai 400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 2270 3279

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
ई-मेल email: helpdoc@rbi.org.in

नोव्हेंबर २९, २०१०

**ठेवी गोळा करणाऱ्या अनधिकृत कंपन्यांबाबत आरबीआयचा जनतेला सावधानतेचा इशारा**

भारतीय रिझर्व बँकेने, आम्हाला प्राधिकृत केले आहे असे सांगून, जनतेकडून पैसे गोळा करणाऱ्या अनधिकृत कंपन्यांबाबत रिझर्व बँक, आज जनतेला सावधानतेचा इशारा देत आहे. रिझर्व बँकेकडून सांगण्यात येते की, तिने तिच्या वेबसाईटवर (http://rbi.org.in/scripts/BS_NBFCList.aspx) जनतेकडून ठेवी स्वीकारण्यास परवानगी असलेल्या अबँकीय वित्त कंपन्यांची यादी प्रदर्शित केली आहे. त्यामुळे अनधिकृत रितीने असे करणे हे लबाडीच असून त्याबाबत कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या विभागांकडून तपास करावा लागेल.

ह्याबाबत जनतेला सावध करण्यासाठी रिझर्व बँकेने वेळोवेळी जहिरातीही प्रसिध्द केल्या आहेत.

रिझर्व बँकेकडून असेही सांगण्यात आले आहे की, अनधिकृत पणे पैसा स्वीकारण्याच्या आणि पैसे फिरविण्याच्या योजनांबाबतच्या सर्व तक्रारी, संबंधित राज्य सरकारांच्या आर्थिक गुन्हा विभागाकडे केल्या जाव्यात.

असे कळविण्यात आले आहे की, काही व्यक्ती/कंपन्या/संस्थापित न झालेले व्यक्तींचे (अन्इनकॉर्पोरेटेड बॉडीज)/मार्केटिंग कंपन्या आणि मनी सर्क्युलेटिंग योजना राबविणाऱ्या कंपन्या, जाहिराती देऊन किंवा उत्पादांची विक्री ह्यांच्याद्वारे, खूप मोठा नफा मिळण्याबाबत मोठी आश्वासने देऊन जनतेकडून पैसा गोळा करत आहेत. त्यापैकी काही असाही दावा करतात की, त्यांच्या अशा ह्या व्यवहारासाठी त्यांना रिझर्व बँकेची मंजुरीही आहे. ह्या अशा संस्थांपैकी काही संस्था त्यांनी गोळा केलेला पैसा न देता गायब झाल्या आहेत.

मनी सर्क्युलेटिंग योजनांवर, प्राईज चिट ॲड मनी सर्क्युलेटिंग स्कीम्स (बॅनिंग) अधिनियम, १९७८ अनुसार बंदी घालण्यात आली आहे. आणि अशा योजनांमध्ये गुंतलेल्या व्यक्तींविरुध्द कारवाई करण्याचे अधिकार संबंधित राज्य सरकारांना दिलेले आहेत.

अल्पना किल्लावाला
मुख्य महाव्यवस्थापक

वृतपत्रासाठी वितरण :२०१० -२०११/७४६